माहे मार्च २०१९ मध्ये सिल्लोड नगर परिषदेची मुदत संमाप्त होत असल्याने अध्यक्ष /सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०१९.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०१९.

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

प्रति,
जिल्हाधिकारी,
औरंगाबाद.

**विषय:- माहे मार्च-२०१९ मध्ये सिल्लोड नगर परिषदेची मुदत समाप्त होत असल्याने अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०१९.**

**संदर्भ :-** १. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१५/का-०६, दि.१५/१०/२०१८ चे पत्र.
२. आयोगाचे समक्रमांकाचे दि.०९/०१/२०१९ रोजीचे आदेश.
३. आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.९/का-६, दि.१०/०१/२०१९ रोजीचे आदेश.

**महोदय,**

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांच्या मुदत समाप्तीपूर्वी घेणे राज्य निवडणूक आयोगावर बंधनकारक आहे. त्यानुसार **सिल्लोड** नगर परिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांची सार्वत्रिक निवडणूक घेणे आवश्यक आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने ३ टप्पे असतात :-

(i) प्रभाग रचना

(ii) भारत निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय तयार केलेल्या मतदार यादीचे Cut-off date रोजी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन

(iii) प्रत्यक्ष निवडणूक

२.१ राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रानुसार **सिल्लोड नगरपरिषदेची** प्रभाग रचना करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

३. सिल्लोड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयोगाचे दि.०९/०१/२०१९ च्या आदेशान्वये मंगळवार दि.०१ जानेवारी, २०१९ हा अर्हता दिनांक ग्राह्य धरुन दि. ११ जानेवारी, २०१९ ही Cut-off date जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि. ११ जानेवारी, २०१९ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरण्यात येईल. (महाराष्ट्र नगरपरिषदा व नगर पंचायती अधिनियम १९६५ च्या कलम ११ अन्वये)

४. नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

माहे मार्च-२०१९ मध्ये मुदत समाप्त होणाऱ्या **सिल्लोड नगरपरिषदेमधील** अध्यक्ष व सदस्य पदांची सार्वत्रिक निवडणूक-२०१९.

## आदेश

५. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-** दिनांक ०१/०१/२०१९ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक ११ जानेवारी, २०१९ पर्यंत अद्ययावत केलेली विधानसभेची मतदार यादी सिल्लोड नगरपरिषदेमधील अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरण्यात येईल.

६. वरील मतदार यादी ग्राह्य धरुन सिल्लोड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि.१६/०१/२०१९ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दि.१६/०१/२०१९ ते दि.१९/०१/२०१९ |
| (iii) | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : | दि.२५/०१/२०१९ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे आणि मतदान केंद्र निहाय मतदार याद्या प्रसिध्द करणे | : | दि.२९/०१/२०१९ |

७. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

७.१ मुख्याधिकारी, सिल्लोड नगर परिषद यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालील बाबींचा विचार करुन प्रभागनिहाय विभाजन करावे :-

(i) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आवश्यक ते विधानसभा क्रमांक, मतदार संघ व यादी भाग क्रमांक इ. प्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून आवश्यक विधानसभा मतदार संघाची मतदार यादी प्राप्त करुन घ्यावी.

(ii) आयोगातील संगणकीकरण कक्षाकडून तयार केलेले यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावे.

(iii) यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर Election Assembly Master, Ward Master इ. अपलोड करावे. कंट्रोल चार्ट तयार करुन तो योग्य असल्याची खात्री करावी व संगणकीकरण कक्षाकडूनही तो योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून मतदार यादीच्या PDF तयार करणे.

७.२ **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित नगर परिषदांच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि नगर परिषदांसाठी तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधीत प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.६/का-५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

७.३ महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

८. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला संबंधित मुख्याधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

९. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधीत मुख्याधिकारी यांनी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

९.१ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दि.१६/०१/२०१९ ते दि.१९/०१/२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, नगर परिषदांच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

९.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

१०. संबंधीत मुख्याधिकारी यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना विहित तारखेस प्रसिध्द करण्यात यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

११. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस मुख्याधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(i) नगर परिषदेचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र

(iii) नगर परिषदेच्या तहसील कार्यालयाचे सूचना फलक.

(iv) स्थानिक केबल टि.व्ही.

(v) जिल्हाधिकारी व नगर परिषद यांचे संकेतस्थळ, इत्यादी.

१२. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर सिल्लोड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत न्यायालयाचे / शासनाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१३. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांची राहील.

१४. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाचे नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास दूरध्वनी किंवा ई-मेलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

**सर्वश्री. समीर गंदपवार व नंदलाल कुचे (संगणकीकरण कक्ष)**

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५० / २२०२२९०९, email - sec.mh@gov.in

१५. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

१०/०९/२०१६

(संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
७. मुख्याधिकारी, सिल्लोड नगर परिषद, सिल्लोड यांना आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी
८. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती (का-६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

63

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१/का.६
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ९ जानेवारी, २०१९.

**विषय :- माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये होणाऱ्या सिल्लोड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक अधिसूचित करण्याबाबत....**

संदर्भ :- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११ अन्वये आयोगास प्रदान करण्यात आलेले अधिकार.

## आदेश

उक्त संदर्भिय अधिनियमाव्दारे प्राप्त अधिकारांचा वापर करुन क्रमांक-रानिआ/जिपपंस.२०१८/प्र.क्र.१८ /का-७, दिनांक २७ जुलै, २०१८ च्या आदेशान्वये माहे नोव्हेंबर, २०१८ ते फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत होणाऱ्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी दिनांक १ सप्टेंबर, २०१८ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या वापरण्या संदर्भात अधिसूचित करण्यात आले होते.

२. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०२/०१/२०१९ च्या पत्रान्वये दिनांक ०१ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारित अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यासाठी ११ जानेवारी, २०१९ हा दिनांक भारत निवडणूक आयोगाकडून निर्धारित केल्याचे आयोगास कळविले आहे. हे ध्यानी घेता नव्याने नोंदणी झालेले मतदार मतदानापासून वंचित राहू नये. तसेच सिल्लोड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता दिनांक ११/०१/२०१९ ही विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक अधिसूचित करुन मतदार यादीसह प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम विहित मुदतीत पार पाडणे शक्य आहे.

३.	ही वस्तुस्थिती लक्षात घेता, समक्रमांकाच्या दि.२७ जुलै, २०१८ रोजीच्या आदेशान्वये अधिसूचित केलेली अधिसूचना अंशतः सुधारीत करुन सिल्लोड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता मंगळवार दिनांक ०१ जानेवारी, २०१९ हा अर्हता दिनांक ग्राह्य धरुन दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी अस्तित्वात येणारी महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, या अधिनियमांतर्गत प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येईल, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणुक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र